स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 25–06–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | **सभापती** |
| 2. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 3. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 4. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 5. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 6. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 7. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 8. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 9. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 10. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 11. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 12. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 13. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 14. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 2. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त (1)
**2.** श्री. अजिज शेख, अति. आयुक्त (II) ( अति. कार्यभार)
**3.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 128</u>:– {जाहिरात विभाग} अजनी चौक, नागपूर येथील क्लॉक व टॉवर व त्या सभोतालचे परिसराचे विकास/सौंदर्यीकरण व रखरखाव बि.ओ.टी. तत्वावर १० वर्षाकरीता करणे आणि त्या मोबदल्यात पाच ठिकाण गॅन्ट्री उभारुन त्यावर जाहिरातीचे हक्क प्रदान करण्यास्तव स्थायी समिती मंजुर ठराव क्र. ८७, दि. ११.०६. २०१५ अन्वये मंजुर करण्यात आले होते. तथापी त्यापैकी दोन ठिकाण राष्ट्रीय महामार्ग यांनी नाकारल्यामुळे रद्द करण्यात आले. या अनुषंगाने नस्तीत जोडलेले सात ठिकाणी गॅन्ट्र मंजुर करणे व फक्त सहा ठिकाणी गॅन्ट्री उभारुन त्यावर जाहिरातीचे हक्क प्रदान करण्यास्तव निविदा बोलविण्याचा प्रश्न विचारात घेऊन तीन वर्षाचा प्रस्ताव विभागाने सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 129ः–** प्रभाग क्र. १३, वर्मा ले–आऊट येथील रस्त्याचे रूंदीकरण
**{लोककर्म विभाग}** व डांबरीकरण करणे रूपये ७०४२०६२/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्ट यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.०६ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ६३३३६३०/– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लॉट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लॉट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 130ः–** प्रभाग क्र. १८ (अ+ब+क) मधील श्री बांगरे ते नवप्रतिभा
**{लोककर्म झोन 06}** हायस्कुल पर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. ७८६ कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेकोरेशन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा १५.१२ प्रतिशतने कमी व नविन C.S.R. दरांपेक्षा ०.४० प्रतिशतने कमी दरांची रू.३७,७४,७६०/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा, स्थायी समिती ठराव क्र. ९३ दिनांक १०.५.२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार नविन आर्थिक वर्षात तरतुद नोंदवून मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 131ः–** प्रभाग क्र. १६ पावनभुमी महादेव मंदीर जवळील रस्त्याचे
**{लोककर्म विभाग}** बांधकाम व डांबरीकरण करणे रूपये ३२,४१,२८६/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्टस यांची प्राकलनिय दरापेक्षा १२.२१ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २८४५५२५/– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लॉट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लॉट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 132ः–** प्रभाग क्र. ३७ गजानन नगर येथील (राऊत ते बांदरे,
**{लोककर्म विभाग}** पुराणिक ते पांडे, तिजारे ते लोणारे) रस्त्याचे बांधकाम करणे रूपये २५७६५९४/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्ट यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.२७ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २३११९७८/– ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लॉट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लॉट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 133ः–** प्रभाग क्र. १३, डागा ले–आऊट येथील रस्त्याचे
**{लोककर्म विभाग}** रूंदीकरण व डांबरीकरण करणे रूपये ६१३७१८०/– चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे. राजधानी इन्फ्रा प्रोजेक्ट यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.०५ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ५५२०३९३/– ची निविदा

मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लाँट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लाँट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 134:—** प्रभाग क्र. १६ पूर्व धंतोली व कॉंग्रेस नगर येथील विविध
**{लोककर्म विभाग}** रस्त्यांचे डांबरीकरण करणे रूपये ३९०४६५३/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्ट यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.१५टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३५०८३३०/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लाँट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लाँट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 135:—** प्रभाग क्र. १६, बजाज नगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व
**{लोककर्म विभाग}** डांबरीकरण करणे रूपये ५२८२०४४/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्ट यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.१३ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ४७४६९७२/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लाँट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लाँट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 136:—** प्रभाग क्र. १७, रामबाग वस्ती रामबाग वसाहत (म्हाडा
**{कार्य. अभि. प्रकल्प}** कॉलनी) एम. आय. जी. कॉलनी व एल. आय. जी. कॉलनी व रामबाग वसाहत येथील सीसी फ्लोरिंग करणे रूपये ४७०२२१६/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे. महेश चेडंके यांची प्राकलनिय दरापेक्षा १.०१ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ४६५४७२४/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 137:—** प्रभाग क्र. १९ ड येथे संत्रा मार्केट बजेरिया कृष्णा टॉकीज
**{लोककर्म झोन 06}** पासुन ते मनिलाल ॲन्ड कंपनी पर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. एन. एन. बेलखुडे यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा १४.०८ प्रतिशतने कमी व नविन C.S.R. दरापेक्षा ८.७४ प्रतिशतने कमी दरांची रू.२७,०३,२८८/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 138:—** प्रभाग क्र. ३६ रामकृष्ण नगर येथील आंतरीक रस्ते
**{लोककर्म विभाग}** डांबरीकरण करणे व पेव्हर ब्लॉक लावणे रूपये २८७०५३८/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, डी.सी.गुरूबक्षानी यांची

प्राकलनिय दरापेक्षा ३.६५ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २७६५७६३.३६/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 139</u>:— {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. १६ सुरेंन्द्र नगर व एल.आय.सी.कॉलनी येथे रूंदीकरण व डांबरीकरण करणे रूपये ४४०४६१७/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्टस यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.३३ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३९४९६२०/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लॉट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लॉट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 140</u>:— {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. ३४ जयवंत नगर व फुलमती ठाकुर ले—आऊट मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे रूपये ३२७१९००/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्टस यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.१९ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २९३८४९३/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लॉट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लॉट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 141</u>:— {कारखाना विभाग} नागपूर महानगर पालिकेतील निर्लेखीत झालेली व मुल्य निर्धारित झालेली 05 नग वाहने यांचे सर्वेक्षक व मुल्य निर्धारक यांच्यातर्फे प्राप्त निर्धारित मुल्य (रु. 69,500/-) दराच्या वर विक्री करण्याकरीता ई—निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 142</u>:— {लोककर्म विभाग} प्रभाग क्र. ३४ ठाकरे ले—आऊट आशिष मस्के यांच्या घरापासून ते महालक्ष्मी हार्डवेअर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे रूपये ३४९३५५७/— चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, राजधानी इन्फ्रा प्रोजेक्ट यांची प्राकलनिय दरापेक्षा ११.९४ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३०७६४२६.२९/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाचे अनुषंगाने निविदाकाराचा हॉट मिक्स प्लॉट हा DM60 किंवा निविदा अटी शर्ती प्रमाणे आहे का तपासावे. तसेच हॉट मिक्स प्लॉट योग्य स्थितीत असल्यास यांत्रिकी अभियंता यांचेकडुन तपासणी करुन तसे प्रमाणित करुन द्यावे व प्रस्तावित विषय सात दिवसात स्थायी समिती समोर पुन्हा सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यात समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 143</u>:— {स्लम विभाग} प्रभाग क्र. 33 (क) अंतर्गत रामेश्वरी येथील सिमेंट कॉक्रीटचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त एकुण 07 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. जी. बी. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 17.07% कमीवर असलेली रूपये 41,43,865/— (रूपये एकेचाळीस लक्ष, त्रेचाळीस हजार आठशे पासष्ठ फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 144:– {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. १९ ड बजेरिया येथील प्रल्हादराय शिवनारायण अग्रवाल मार्गाचे सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 5 निविदांपैकी मे. एन. एन. बेलखुडे यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा १२.७८ प्रतिशतने कमी व नविन C.S.R. दरांपेक्षा १०.०५ प्रतिशतने कमी दरांची रू.८९,८०,०४०/– रकमेची निम्नतम निविदा स्थायी समिती ठराव क्र. ३८ दिनांक १६.०४.२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार नविन आर्थिक वर्षात तरतुद नोंदवून मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 145:– {ई–गव्हर्नन्स} e-Governance विभागासाठी Project Manegment Unit (PMU) नियुक्त करण्याबाबत.

मनपा तर्फे JNNURM अंतर्गत ई-गव्हर्नन्स ERP Software तयार करण्याचे काम 2007 मध्ये सुरु झाले व 2010 ला ERP Software सुरु करण्यात आले व त्याचा Support 2016 पर्यंत होता. आता या ERP चे maintenance, support, enhancement व upgradation चे कंत्राट M/s Mars Telecom Systems, Pvt. Ltd. यांना देण्यात आले आहे.

मनपाच्या ई-गव्हर्नन्स विभागाकडे स्वतःचा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे मनपाच्या विविध आस्थापनेवर असलेले IT चे थोडेफार ज्ञान असलेल्या कर्मचाऱ्यांना ई-गव्हर्नन्स विभागात कामास्तव बोलविण्यात आलेले आहे. तसेच IT विभाग निर्माण करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे IT Cadre सादर करण्यात आले आहे. सध्या मनपाच्या e-Governance विभागामध्ये उपलब्ध असलेल्या अतिशय कमी तांत्रिक कर्मचारी वर्गावर कामाचा प्रचंड ताण असल्यामुळे तांत्रिक बाबींवर योग्य ते लक्ष देणे शक्य होत नाही.

सबब ई-गव्हर्नन्स विभागासाठी Project Manegment Unit (PMU) ची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. या कामासाठी खालील प्रमाणे नियुक्ती करणे प्रस्तावित आहे:

1) Principal Consultant – 1
2) Senior Consiltatnt - 1
3) Consultant – 1

वरील साठी प्रति महिना रु. 8,01,000 /- (वार्षिक रु. 96,12,000 ). खेरीज मनपाच्या कामासाठी बाहेर गावी जावे लागल्यास अधिक T.A., D.A., Boarding & Lodging, ईत्यादीचा खर्च येईल असे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. 20/03/2018 च्या GR क्र. GAD-मातंसं/080/4/2014-0/0 Directorate A IT-DIT(MH) च्या शासन निर्णयात नमूद असून अशा प्रकारच्या कामासाठी खालील एजन्सीज शासनाने प्राधिकृत केल्या आहेत.

१) M/s Deloitte
२) M/s Ernst and Young
३) M/s Grant Thornton
४) M/s PwC
५) M/s KPMG
६) M/s Wipro

मनपास अपेक्षित कामाचे स्वरूप (Scope of Work) DIT ला पाठविणे शासन निर्णय नुसार आवश्यक असून त्यानंतर त्यांच्या सल्यानुसार योग्य एजन्सीची PMU म्हणून 1+1 वर्षाकरिता निवड करण्याच्या कामाला मंजूरी देण्याचा **प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक 146ः— {शिक्षण विभाग} मनपाच्या गरीब नवाज उर्दू उच्च प्राथ. व माध्यमिक शाळेकरिता 17 खोल्याचा किराया प्रती महिना रू. 1,19,435/— स्थायी समिती ठराव 122, दि. 04.08.2017 नुसार मंजूर होता. त्याची मुदत दि. 03.01.2018 ला संपुष्टात आल्यामुळे घरमालक मोहम्मद गुरफान रहमान अली यांच्याकडून इमारतीच्या खोल्याचे भाडे नगररचना विभागाकडून फेरमुल्यांकन करून घेण्यात आले असून मासिक भाडे रू. 1,19,435/— मंजूर केले आहे.

नगर रचना विभागातर्फे घरभाडे फेरमुल्यांकन केले असून एकूण 17 खोल्याचा किराया प्रति महिना रू.1,19,435/— प्रमाणे मंजूर केलेला असून मुदत वाढ दि. 04.01.2018 पासून पुढे चार वर्षासाठी मान्य करण्यासाठी तसेच सदर खर्च आय व्यय पद क्र. 425/A25202021010 मधून मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 147ः— {विद्युत विभाग} नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील नविन प्रशासकीय इमारतीमधील सातव्या माळयावरील स्मार्ट सिटी व सस्टेनेबल डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशन लि. नागपूर कार्यालयाचे विद्युतिकरण करावयाच्या प्रस्तावित कामाच्या रू. 67,15,440/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. ए40200440702 या पदा अंतर्गत प्रावधान उपलब्ध करावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 148ः— {स्लम विभाग} नागपूर महानगरपालिकेतर्फे ग्रामीण पोलीस ऑफीस, पाटनकर चौक जवळील सार्वजनिक सुलभ शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रू. 27,78,731/— (सत्तावीस लक्ष अठ्ठ्यात्तर हजार सातशे एकतीस फक्त) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ.—1000/सं.क्र.—241/प्र.क्र. 13/पा.पु. —21, मंत्रालय, मुंबई 32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम ''मे. मेहतर समाज मागासवर्गीय सर्वांगीण विकास'' संस्थेकडुन शासन निर्णय क्र. गवसु/1088/सी.आर. 2018, भा.ग.—2/का—7, मंत्रालय, मुंबई—32, शुध्दीपत्रक दि. 05 नोव्हेंबर 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथील करून प्राकलनिय दर अधिक 15 टक्के कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देवुन त्यांचे मार्फत ''पैसे द्या व वापरा'' तत्वावर सार्वजनिक शौचालय बांधणे व 30 वर्षाकरिता संचालन करणे व देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास व पद क्र. A 4 45 013 723 05 (639) अंतर्गत तरतुद मुक्त करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 149ः— {आरोग्य विभाग} केंद्र शासनाने सन २०१४ मध्ये स्वच्छ भारत अभियान घोषित केले आहे. याअंतर्गत शहरांना केंद्रशासन व राज्यशासनामार्फत वेळोवेळी घनकचरा व्यवस्थापनाबाबत सूचना, व आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेने डिसेंबर २०१५ मध्ये नागपूर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तांत्रिक सल्लागार मेसर्स आर. जगताप अॅन्ड असोसिएट, नागपूर यांचे मार्फत तयार करुन तो स्वच्छ महाराष्ट्र मिशन पुढे मान्यतेस ठेवण्यात आला. या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची राशी रु. ३०८.०० कोटी होती व त्यास राज्य शासनाचे मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक २२.०३.२०१६ रोजी झालेल्या

बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. मनपाचा ३०८ कोटी रुपये अपेक्षित खर्चाचा DPR रु. २८८.६८ कोटी वर सिमित केला आहे.

उक्त DPR च्या उपांगांपैकी ३(d) – Incinerator for Disposal of Dead Animal Carcass साठी मनपाच्या सल्लागाराच्या पॅनलवर असणारे मेसर्स आर जगताप ॲन्ड असोसिएट्स यांचे कडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला आहे. प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागारासाठी स्थायी समिती ठराव असून स्थायी समिती ठराव क्र. ४९९ दि. २०/०१/२०१६ अन्वये मा. मुख्य अभियंता यांचे परिपत्रक क्र. ४९, दि. २८.०३. २०१६ अन्वये मंजूर fees structure नुसार Pre-tender & Post-tender activities करीता प्रदान करण्यात येईल. सदर प्रकल्प रु. ३५० लक्ष राशीचा असून त्याकरीता मौजा भांडेवाडी येथे मनपा मालकीची कत्तलखान्याकरीता आरक्षित जागेपैकी १८०० स्के.मि. जागा प्रस्तावित आहे.

सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर प्रकल्प उभारणीकरीता निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 150:—**
**{लोककर्म झोन 06}**

प्रभाग क्र. १९ ड नमकगंज येथील साईबाबा बेकरी पासून निशा कलेक्शन दाजीशाळेपर्यंत नाल्याचे बांधकामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. जितू कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा १८.०० प्रतिशतने कमी दरांची रू.३०,०२,१४३/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 151:—**
**{आरोग्य विभाग}**

Supply Installation Operation, Implementation and Maintenance of Kiosk for NMC Hospital.

Supply Installation Operation, Implementation and Maintenance of Kiosk for NMC Hospital.या कामा करीता Mahatender द्वारे Online निविदा मागविण्यास्तव मा. स्थायी समीती यांची ठराव क्र. 178 दि. 10/10/2017 च्या प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली असता निविदा मागविण्यात आलेली असून प्राप्त निविदेस मा. आयुक्त यांचे दि. 7/5/2018 ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

संबधीत कामा ची निविदा तिन वर्षासाठी प्रस्तावीत असून वार्षीक खर्च रू. 5692200/- आहे. संबधीत कामासाठी येणारा खर्च हा प्रशासकीय मान्यतेनुसार पद क्र. A27002441601 या मधुन भागविण्यात येईल. निविदेतील अटी व शर्ती ला अधीन राहुन सबंधीत कामाचा प्रस्ताव मा. स्थायी समीती यांचे कडे मंजुरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 152:—**
**{सा.प्र.विभाग}**

नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर महत्वाच्या विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता एकुण 03 पर्यवेक्षक व 75 सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) कार्यरत असून कंत्राटाची मुदत दि. 15.06.2018 ला संपुष्टात येत आहे. पुढील दि. 16.06.2018 ते दि. 15.06.2019 पर्यत एक वर्षाचे कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन दर व इतर लागू असलेले भत्ते व वेळोवेळी शासनाची होणारी वाढ (विशेष भत्ते) प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पूणे (मेस्को) यांना कत्राटाची मुदतवाढीस मंजुरी व आवश्यकतेनूसार सुरक्षा रक्षकांचे संख्येत बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न व नविन कार्यादेश होईपर्यत शासनाचे किमान वेतन व भत्ता लागू असलेले सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या भत्ते प्रमाणे कार्यादेशास एक वर्षाची मुदतवाढ देणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 153:—**
**{शिक्षण विभाग}**

कार्यकारी अभियंता जलप्रदाय विभाग यांनी शिक्षण विभागाकडे शाळांचे प्रलंबित पाण्याचे देयक पाठविले असून जलप्रदाय

विभागाव्दारा पुरवठा करण्यात आलेल्या पुरवठयाच्या देयक रक्कमेपोटी रू.1,32,09,457/– इतकी रक्कम प्रलंबित दर्शविण्यात आलेली आहे. या देयकांना प्रमाणित करून शिक्षण विभागामार्फत खर्चाचे व्यय शिर्षातून प्रावधान देवून समायोजन जलप्रदाय विभागाचे आयशिर्ष क्र. A13801920411 मधून करावयाचे आहे.

जलप्रदाय विभागाकडून प्राप्त झालेल्या देयकाच्या अनुषंगाने विभागस्तरावर तपासणी करण्यात येवून मनपाच्या 65 शाळेतील एकुण रू.84,95,166/– चे देयक प्रमाणित करण्यात आले. शिक्षण विभागाकडे पाण्याचा देयकाचा भरणा करण्यासाठी कोणतेही व्यय शिर्ष पद नसून नविन पदनिर्मिती करण्याकरीता व यात रू.1.5 कोटीची तरतूद आर्थिक वर्ष 2018–19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात करण्यास्तव मा.स्थायी समिती अध्यक्ष यांना पत्र क्र.519, दि.16.03.18 व मा.प्र.ले.वि.अ. यांना पत्र क्र.419, दि.03.03.18 अन्वये विनंती केलेली आहे.

देयके तात्काळ भरण्याबाबत कार्यकारी अभियंता, जलप्रदाय विभाग, मनपा यांचे पत्र क्र. 379/जप्र, दि.28.05.18 2. पत्र क्र. 351/जप्र, दि.24.05.18 प्राप्त झालेले आहे. शाळांचा देयकांचा एकत्रित बकाया भरण्यास्तव Contigent Bill तयार करून त्यावर प्रावधान नोंदवून मा.प्र. ले.वि.अ. कडे क्रमांकाची नोंद करून सादर करण्याचे निर्देश जलप्रदाय विभागाने दिलेले आहे.

उपरोक्तमध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रावधान उपलब्धतेशिवाय Contigent Bill वित्त विभागात पाठविता येणे शक्य नाही. प्रस्तुत रक्कम समायोजन करण्यास्तव व नविन पदशिर्ष उपलब्ध करून देण्यास व यात रू.1.5 कोटीची तरतूद उपलब्ध करून देण्यास्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करण्यात येते.

सबब मनपा शाळांच्या पाणी देयकाच्या दि.24.01.18 पर्यंत बकाया राशी रू.84,95,166/– (विभागाव्दारे केलेल्या तपासणीच्या अधीन राहून) चे समायोजन जलप्रदाय विभागाच्या आयशिर्ष क्र.A13801920411 मध्ये करण्याच्या मंजुरीस्तव व याकरीता नविन पदशिर्ष निर्माण करून यात रू.1.5/– कोटीची तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 154:–**
**{स्थावर विभाग}**

मौजा बाभुलखेडा, बॅनर्जी लेआऊट नागपूर येथील भगवाननगर मराठी प्राथमिक शाळा परिसरातील व्यायामशाळा इमारत (बांधीव क्षेत्र ७८.०८ चौ.मी.) व वाचनालय इमारत (बांधीव क्षेत्र ३३.८० चौ.मी.) या इमारती रुखमन पात्र मेमोरियल सोसायटी चे सॅक्रेड स्कूल यांना शैक्षणिक वापराकरीता अनुक्रमे रु.९३६०/- प्रति महिना व रु.४०५६/- प्रति महिना नुसार प्रथम ११ महिन्यांचे कालावधीकरीता आगावु भाडे भरण्याचे अटींवर व खालील नमूद अटीं व शर्थीवर भाडेतत्वावर देण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाच्या मंजुरीकरिता पाठविण्याच्या शिफारशीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 155:–**
**{आरोग्य विभाग}**

नागपुर शहरात म.न.पा च्या सर्व दहन घाटावर मोफत दहनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. म.न.पा द्वारे दहना करीता आवश्यक असणारे लाकुड व शेणाच्या गोव–या निशुल्क स्वरुपात पुरविण्यात येतात. त्याच प्रमाणे अंबाझरी व मोक्षधाम दहनघाटावर एल पी जी शवदाहनी असुन गंगाबाई व वैशाली दहन घाटावर डिझल शवदाहीनीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वरील दहन सुध्दा निशुल्क करण्यात येते. एल पी जी व डिझल शवदाहीनीच्या वापरास अल्पसा प्रतीसाद असल्यामुळे मोठया प्रमाणात लाकडांचा पुरवठा करावा लागतो व यामुळे पर्यावरणाची हानी होते.

दहनाची प्रक्रीया पर्यावरण पुरक व्हावी म्हणुन मोक्षधाम, मानकापुर,मानेवाडा,सहकार नगर या चारही दहनघाटावरील दहन पुर्णत लाकुड मुक्त करण्याचा विभागाचा प्रस्ताव आहे. अश्या प्रकारची व्यवस्था करण्याकरीता या चारही दहनघाटावरील सर्व ओंटयावर पर्यावरण पुरक दहन करण्यासाठी विशेष प्रकारचे पिजंरे स्थापित करण्यात येणार आहे. या पिजं–या मध्ये गोव–या व मोक्षकाष्ठ (बायोमास ब्रिकेट किंवा बायोकोल) या दहन सामुग्रीच्या मदतीने प्रेता वर दहन क्रिया करण्यात येतील तसेच मोक्षकाष्ठा द्वारे दहन निशुल्क राहील. व

लाकडाद्वारे दहन शुल्क आकारुन करण्यात येईल. लाकडाद्वारे प्रति शव दहनास रु. 2211/— खर्च असून बायोकोल किंवा बायोमॉस ब्रिकेटद्वारे प्रति शव दहनास रु. 1750/— खर्च येतो. या दोन्ही बाबींच्या तुलनेत आर्थीक दृष्टया सुध्दा मनपाला रु. 461/— ची बचत होणार आहे.

याआधी अंबाझरी दहन घाटावर मोक्षकाष्ठद्वारे करण्यात येणा—या दहनावर निःशुल्क व लाकडा द्वारे करण्यात येणा—या दहनावर शुल्क आकारुन दहन प्रक्रिया करण्यात येते त्याच धर्तिवर मोक्षधाम,मानकापुर,मानेवाडा,सहकार नगर या चार दहन घाटावर, उक्त अंबाझरी घाटाप्रमाणे नियम लागु करण्याचे प्रस्तावित आहे.

वरील नमुद या चारही दहन घाट पुर्णत लाकुड मुक्त केल्यावर येणा—या काही नागरीकांना अडचणी निर्माण होऊन लाकडावरच दहन करण्यासाठी त्यांचा हट्ट राहु शकतो. अश्या वेळी शव दुस—या दहन घाटावर घेऊन जाण्यास सांगणे सुध्दा योग्य होणार नाही. आधिच शोकाकुल असलेल्या आप्तेष्ठांच्या भावना अधिक दुखावु नये या करीता लाकडावर शुल्क आकारुन लाकंडांची उपलब्धता करुन देण्याचे प्रस्तावीत आहे. या करीता वेळोवेळी उपलब्ध निविदा दरानुसार प्रती किलो किंवा प्रति, शवा प्रमाणे लाकडांसाठी शुल्क आकारण्या करीता स्थायी समीती च्या धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

यास्तव उपरोक्त नमुद दहन घाटावर बायोकोल किंवा बायोमास ब्रिकेस द्वारे शवदहन निःशुल्क व लाकडाद्वारे शवदहन करिता शुल्क आकारण्या बाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 156:—</u>**
**{जलप्रदाय विभाग}**

ईटारसी पुलीया रोड जरिपटका येथील जिंजर माल चौकापासुन बाराखोली चौकापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता टप्पा — 2 मधील पॅकेज क्र. 22 अंतर्गत सिमेंट क्रॉक्रीट रस्ता तयार करण्यात आलेला आहे व रस्त्यावर उजव्या बाजुला 300 मि.मि. व्यासाची मुख्य जलवाहीनी तयार करण्यात आलेल्या सिमेंट क्रॉक्रीट रस्त्यात आलेली आहे व भविष्यात पाईप लाइन दुरूस्ती व सुस्थितीच्या कामात मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होणार आहेत. करिता सदहू पाईपलाईन रस्त्याच्या बाजुला तयार करण्यात आलेल्या पेव्हर ब्लॉकच्या खालुन टाकणे गरजेचे आहे.

सदहू काम करण्यास्तव रू. 34,77,445/— या प्राकलनेस तांत्रीक मंजुरी व प्रावधान उपलब्ध आहे. करिता रू. 3477445/— चे प्राकलनास, मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 157:—</u>**
**{बाजार विभाग}**

महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन ने पोद्यारेश्वर राम मंदिर जवळील खोवा व पान मार्केट मधील दुकाने तोडुन ती जागा मेट्रो करीता अधिग्रहीत केलेली आहे. यामध्ये 52 परवानाधारकांची दुकाने व दोन शिकस्त इमारतीतील 10 परवानेधारक बाधित झाले आहे. यासर्व 62 परवानेधारकांची पर्यायी व्यवस्था महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन ने हिंदी भाषी संघ समोरील मोकळ्या जागेत बांधलेल्या ओटयांवर करण्याबाबत म.न.पा. सभागृहाने दि. 6/10/2016 रोजीच्या ठराव क्र. 341 अन्वये मान्यता प्रदान केली आहे. यापैकी बहुतांश परवानेधारक पान विक्रेते आहेत तथापी खोवा विक्रेते म.न.पा. चे परवानेधारक नाहीत परंतू ते खोवा व पान मार्केट मध्ये पान विक्रेत्यांसोबत संयुक्त रित्या व्यवसाय करीत होते असे समजते त्यामुळे त्यांना देखील हिन्दी भाषी संघ येथील ओटयांचे आवंटन करणे आवश्यक आहे. जुन्या खोवा व पान मार्केट मधील परवानाधारकांचे पुनर्वसन केल्यानंतर देखील चौथ्या पंक्ती मधील ओटा क्र. 77 ते 102 एकुण 26 ओटे खोवा विक्रेत्यांकरीता उपलब्ध होवू शकतील.

सचिव, खोवा दलाल असोसिऐशन यांनी दि. 26/03/2018 रोजी मा. आयुक्त, म.न.पा. यांच्याकडे खोवा व्यवसायीकांकरीता ओटयाचे आवंटन करण्याकरीता सादर केलेल्या निवेदनात हिंदी भाषी संघ शाळे समोरील मोकळया जागेत नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी बांधलेल्या ओटयांच्या चार पंक्ती पैकी क्र. 4 मध्ये 18 खोवा विक्रेत्यांना ओटयाचे आवंटन करण्याबाबत नमुद केले आहे. तसेच खोवा हा पदार्थ जलद नाशवंत असुन नागपूरच्या अतिशय जास्त

तापमानाचा यावर फार लवकर प्रभाव होत असल्याने त्याठीकाणी Deep Freezer ची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने शटरच्या दुकानाचे बांधकाम करण्याकरीता परवानगी मिळण्याबाबत निवेदनात नमुद केले आहे.

सचिव, खोवा दलाल असोसिऐशन यांनी खालील खोवा व्यवसायीकांची यादी सादर केली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1)अशोककुमार मन्निलाल गुप्ता | 7)नारायण नंदकिशोर गुप्ता | 13)रमेश मोतीलाल गुप्ता |
| 2)धर्मेन्द्र रामअवतार गुप्ता | 8)राजेश जुगलकिशोर गुप्ता | 14)धनराज बालेश्वर गुप्ता |
| 3)सुरज नवलकिशोर गुप्ता | 9)विनोदकुमार गुप्ता | 15)बबन कोंडप्पा औरंगपुरे |
| 4)सुनिलकुमार रामदास गुप्ता | 10)कृष्णा अजय गुप्ता | 16)श्रीमती मिना कछवाह |
| 5)राजेंद्र रामअवतार गुप्ता | 11)देवेंद्र सदाशिव औरंगपुरे | 17)रामचंद्र शंभुदयाल गुप्ता |
| 6)राजेश रामधनिजो गुप्ता | 12)जगदिशप्रसाद मोतीलाल गुप्ता | 18)मदनलाल गुप्ता |

सचिव, खोवा दलाल असोसिऐशन यांनी सादर केलेल्या वरील 18 खोवा व्यवसायीकांना ओटयांचे आवंटनाबाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी हिंदी भाषी संघ शाळे समोरील मोकळया जागेवर ओटयांच्या एकुण 4 पंक्तीचे बांधकाम केले असुन यामध्ये एकुण ओटयांची संख्या 102 आहे. 4 थ्या पंक्तीमध्ये क्र. 77 ते 102 क्रमांकाचे 3 × 2.5 मी. चे एकुण 26 ओटे आहेत 4 थ्या पंक्तीमध्ये संपुर्ण ओटयाचे मोजमाप 39 × 5 मी. आहे. 4 थ्या पंक्तीतील संपुर्ण ओटयाचे एकसमान 18 विभाजन करून 2.16 × 5 मी. = 10.80 चौ. मी. क्षेत्रफळ जागेचे आवंटन खोवा दलाल असोसिऐशन यांनी सादर केलेल्या यादीतील 18 खोवा व्यवसायीकांना करण्याचे प्रस्तावित आहे.

2) तसेच आवंटीत केलेल्या ओटयांवर खोवा विक्रेत्यांना स्वःखर्चाने शटरच्या दुकानाचे बांधकामाकरीता परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

3) मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी 4 थ्या पंक्तीमध्ये क्रमांक 77 ते 102 एकुण 26 ओटयांचे बांधकाम केले आहे या संपुर्ण जागेचे 18 विभाजन केल्यास त्यांना 77 ते 94 असे सुधारीत क्रमांक देण्याचे प्रस्तावित आहे.

4) ओटयाचे आवंटन खोवा विक्रेत्यांच्या सहमतीने न झाल्यास सोडतीव्दारे आवंटन करण्याचे प्रस्तावित आहे.

5) सिध्द शिघ्र गणकानुसार आवंटन करण्यात येणाऱ्या प्रत्येक ओटयांचे क्षेत्रफळानुसार मुल्य रू. 6,35,850/— निश्चित करण्यात आले असुन, मासिक परवाना शुल्क रू. 4,244/— आकारण्यात आला आहे. ओटयाचे मुल्य अग्रिम जमा (डिपॉझीट) करून प्रतिमहा परवाना शुल्क रू. 4,244/— यावर संबंधीतांना ओटयाचे आवंटन करण्याचे प्रस्तावित आहे.

6) ओटयाचे आवंटन 11 महिन्याच्या परवान्यावर करण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 332 (ब) नुसार नगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु—आवारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, डपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबद्दल आणि नगरपालिका बाजारात विक्रीसाठी माल मांडणाऱ्या अधिकाराबद्दल आणि अशा कोणत्याही बाजारात विकलेल्या मालाचे वजन करण्याबद्दल व तो मोजण्याबद्दल आणि कोंणत्याही नगरपालिका कत्तलखान्यात जनावरांची कत्तल करण्याच्या अधिकाराबद्दल याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने, आकारणीयोग्य असलेले दुकान—भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याने देण्याची तरतुद आहे.

वरील कलमाला अनुसरून सचिव, खोवा दलाल असोसिऐशन यांनी सादर केलेल्या वरील 18 खोवा व्यवसायीकांना ओटयांचे आवंटनाचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 158</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर